प्रेसनोट

दि.०१/०३/२०२१

# दौंड शासकीय रूग्णालय येथे वैद्यकीय अधिकाऱ्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

---

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आरोपी :- लोकसेवक - मिलिंद दामोदर कांबळे, वय - ३८<br>पद - वैद्यकीय अधिकारी (राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत कंत्राटी नेमणुक)<br>ठिकाण - दौंड शासकीय रूग्णालय ता. दौंड जिल्हा पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १९००/- ( एकोणीसशे रूपये) |
| लाच स्वीकारली रक्कम | १५००/- (पंधराशे रूपये) तडजोडीअंती |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी :- दिनांक २७/०२/२०२१ व दि. ०१/०३/२०२१<br>सापळा दिनांक :- दिनांक ०१/०३/२०२१<br>यातील तक्रारदार यांनी त्यांच्या १९ कामगारांचा दिनांक २६/०२/२०२१ रोजी केस पेपर काढून कोविड १९ च्या रॅपिड अँटिजेन टेस्ट केलेल्या आहेत. त्याचा अहवाल तक्रारदार यांना देण्यासाठी आरोपी लोकसेवक यानी तक्रारदार यांच्याकडे प्रत्येक व्यक्तीसाठी १००/- रूपये प्रमाणे प्रथम १९००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १५००/- रूपये स्वीकारली.<br>दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. गुन्हयाचा तपास श्री. सुनिल बिले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे युनिट करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे, श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अँन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.